KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

Title Code- MAHMAR-51647
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
Digital TV & Broadband Services

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

वर्ष २ रे | अंक : ६३५. वा | शुक्रवार | दि. २२ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# टेकाळेंच्या बदली रद्द प्रकरणावर आता प्रशासन काय भूमिका घेणार?

## बदली अवैध असल्याचा टेकाळेंकडून केला जातोय कांगावा?

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्याच्या महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांची काही महिन्यांपूर्वी मोताळा येथे करण्यात आलेली बदली ही नुकतीच मॅटने रद्द केल्याची माहिती समोर आल्यानंतर महसूल प्रशासनात अनेक तर्कवितर्कांना उधाण आल्याचे दिसून येत आहे. टेकाळे यांची प्रशासनाने केलेली बदली ही अवैध असल्याचे या निकालातून प्रथमदर्शनी स्पष्ट होत असले तरी, यासंदर्भात आता प्रशासनाने आपली बाजू स्पष्ट करणे गरजेचे आहे. प्रशासन आपल्या बाजूने आता यासंदर्भात काय खुलासा करते, याकडे बऱ्याच जणांचे लक्ष लागले आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वाचकांना एव्हाना पूर्णपणे हे माहिती झालेले आहे की, मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी आपल्या सेवाकाळात प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार, भ्रष्टाचार केला, त्यातून प्रचंड प्रमाणात पैसा कमावला आणि त्या पैशातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या आपल्या नावावर आपल्या नातेवाईकांच्या नावावर मोठ्या प्रमाणात संपत्ती / अपसंपदा जमवली. एव्हढेच नाही तर ज्या शासनाकडून वर्षानुवर्षे पगार घेतला, त्या शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलाला चुना लावला. अनेक नागरिकांची अडवणूक, लुबाडणूक केली. एका व्यक्तीचा सातबारा थेट दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर केला. जमीन सम्राटांशी साटेलोटे करून त्यांचे उखळ पांढरे केले. हा संपूर्ण प्रकार टेकाळे राजरोसपणे करीत आहेत. त्यांनी गेल्या अनेक वर्षांमध्ये केलेल्या एकाही गैरव्यवहारावर आणि भ्रष्टाचारावर आजवर एकाही अधिकाऱ्याने कारवाई करण्याची माणुसकी दाखवली नाही. कारण कारवाई केली असती, तर टेकाळे यांच्या भ्रष्टाचारावर कधीच लगाम लागला असता. परंतु तसे होऊ शकले नाही. त्यामुळे विजय दत्तात्रय टेकाळे हे जास्तच मस्तवाल झाले आणि त्यांनी अनिर्बंधपणे भ्रष्टाचार सातत्याने सुरू ठेवला. टेकाळे यांच्या बदलीचे जे प्रकरण मॅटमध्ये गेले होते, त्यात टेकाळे हे तीन वर्षांपेक्षाही जास्त काळापासून एकाच टेबलवर कार्यरत होते. सरकारी नियमानुसार एखाद्या अधिकाऱ्याची तीन वर्षांनंतर बदली करण्याचा नियम आहे. त्यामुळे टेकाळे यांना या ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिकचा काळ झाला होता. अर्थात, टेकाळे यांनी मॅटमधून आपला बदलीचा निर्णय फिरवून आणला. त्यासाठी






टेकाळेंनी काय युक्तिवाद केला आणि टेकाळेंनी काय काय प्रयत्न केले, हे टेकाळेंनाच माहिती. परंतु या बदलीमुळे आता बोट थेट महसूल प्रशासनाकडे गेलेले आहे. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना आता या प्रकरणी योग्य तो खुलासा करावा लागणार आहे. कारण निर्णय हा प्रशासनाच्या विरोधात गेला आहे. मीडियामध्ये आलेल्या बातम्यांनुसार टेकाळे यांच्यावर बदली संदर्भात अन्याय झालेला असून, आता टेकाळे यांना न्याय मिळालेला आहे. याचा अर्थ प्रशासनाकडून करण्यात आलेली बदली ही देखील अन्यायकारक होती, असा आरोप होत आहे. मात्र, तीन वर्षांपेक्षा अधिकचा काळ एका पदावर झाल्यानंतर एखाद्या अधिकाऱ्याची बदली झाली तर ती अन्यायकारक कशी ठरू शकते, हा सर्वात मोठा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. मुळातच टेकाळे यांची करण्यात आलेली बदली ही काही रूटीन ट्रान्सफर नक्कीच नाही. टेकाळे यांनी जे काही गैरव्यवहार केलेत, जो काही भ्रष्टाचार केला आणि ज्या पदावर उपस्थित राहून केला,

> बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या विरोधात झालेल्या तक्रारी व त्यावर झालेल्या चौकशीत दोषी सिद्ध असल्याचे अहवालात नमूद असून जिल्हा प्रशासन गप्प का?मंडळ अधिकारी टेकाळे महाभ्रष्टाचारी करोडो रुपयांची अपसंपदाप्रकरणाचा उलगडा पुढील प्रत्येक सत्रात...

त्यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सातत्याने पाठपुरावा केला होता. टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने केला होता, हेही तितकेच खरे आहे. टेकाळे हे अनेकदा वर्षानुवर्षे एकाच पदावर राहून काम करतात, हा त्यांचा मागचा अनुभव देखील तेव्हढाच मजबूत आहे. त्यांनी यापूर्वीही अनेकदा बुलढाण्यात एकाच कार्यालयात, एकाच पदावर बसून अत्यंत भ्रष्ट पद्धतीने कामकाज केलेले आहे. विशेष म्हणजे त्यांची त्या वेळी बदली होत नव्हती, तेंव्हा मात्र नियमभंग होत नव्हता का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. यासंदर्भात आता जिल्हा प्रशासन काय खुलासा करते, ते महत्वाचे ठरणार आहे. काहीही असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात सातत्याने प्रयत्न करीत राहणार आहे, हेही तितकेच खरे.

# सिंदखेड लपाली शिवारात गांजाचा पेरा आढळल्याने मोठी खळबळ...

## ४० किलो गांजा जप्त; एक अटक...

**जनसंचलन/मोताळा**

तालुक्यातील सिंदखेड लपाली गावातील एकाच्या घरी आणि शेतात तब्बल ४० कीलोंचा गांजा आढळून आल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. सदर धडक कारवाई ही राज्य उत्पादन शुल्क विभागाला गुप्त माहिती मिळाल्याने आज २० डिसेंबर २०२३ रोजी सापळा रचून झालेल्या कारवाईत हा प्रकार उघडकीस आला. या कारवाईत धामणगाव बढे पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरकडे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर सापळा रचून शेतातील गांजा पोलिसांनी शोधून काढला. मिळालेल्या माहितीनुसार सिंदखेड लपाली येथील शेतकरी गोपाल मुंढाळे यांच्या शेतामध्ये व राहत्या घरी गांजा आढळल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. रात्री उशिरापर्यंत



पुढील कार्यवाही सुरू होती. सदर कारवाई पथकात ठाणेदारासह पोलिस कर्मचारी नितीन इंगळे, मापारी, सोनवणे, रोकडे तथा उत्पादन शुल्क विभागाचे पथक सहभागी होते.

डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे .....
निकम ऑक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
संधीवातावर उपचार
गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
मणक्यातील आजारावर उपचार
दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
कंबरेचे व मानेचे दुखणे
पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# येत्या ३ जानेवारीला चिखली येथे विधवा, परित्यक्ता यांचा परिचय व समुपदेशन मेळावा !

**जनसंचलन/ चिखली**

विधवा, परित्यक्ता महिलांचे पुनर्वसन आणि पुनर्विवाह यासाठी प्रयत्न केले तर समाजातील अनेक महिलांचे जगणे सोपे होणार आहे. मात्र, सामाजिक धारणेमुळे त्या लग्न करत नाहीत. तर काही समाजामध्ये तशी मान्यताही नसते. अलीकडे नोकरी, रोजगार, व्यवसाय, नसल्याने अनेक विवाहयोग्य तरुणांना मुली मिळत नाही. नेमकी ही बाब हेरून प्रा.डी. एस.लहाने यांनी पुरोगामित्वाचे पाऊल उचलत चिखलीत विधवा, परित्यक्ता परिचय व समुपदेशन मेळाव्याची अभिनव संकल्पना मांडली आहे. स्थानिक श्रीराम नागरी पतसंस्थेच्या सभागृहात १९ डिसेंबर रोजी पार पडलेल्या बैठकीत प्रा.लहानेंनी ही माहिती दिली. यावेळी श्रीराम नागरीचे अध्यक्ष पंडितराव देशमुख, सी अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शे.अनिस, डॉ.सत्येंद्र भुसारी, रामेश्वर पाटील, बाळासाहेब ठाकरे, कमलकिशोर लांडगे, दिपक म्हस्के, आशीष लड्ढा, प्रा.शाहीना पठाण, प्रतिभा भुतेकर, सोनुने, बाळु पवार, मनोज दर्डा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रा.लहानेंनी यापूर्वी बुलढाण्यात सामाजिक बदल घडवणारे क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. त्यापश्चात आता चिखलीत येत्या ३ जानेवारीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीला हा उपक्रम राबविण्याचा विचार या बैठकीत मांडला असता उपस्थित चिखलीकरांनी यास सर्वतोपरी सहकार्याचा समाजाधार दिला. प्रामुख्याने अनेक महिलांना कोणतीही चूक नसताना वैवाहिक आयुष्याच्या सुरूवातीलाच किंवा मध्यावर पतीच्या अकाली निधनाने उर्वरित आयुष्यात विधवेचे जीवन जगावे लागते. काही महिला घटस्फोटीत तर काही परित्यक्ता. अशा महिलांना समाजात वावरताना व एकाकी जीवन जगताना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. यातून त्यांना दिलासा मिळावा यासाठी प्रा.लहानेंही पुढाकार घेतला आहे. पतीच्या निधनानंतर कमी वयातील महिला आयुष्यभर आपले जीवन विना जोडीदार राहतात. काही समाजात दूसरे लग्न मान्य नसते. त्यामुळे त्या पुढचे पाऊल टाकण्याची हिंमत करत नाही. तर समाजदेखील जे पूवीर्पासून सुरू आहे. त्याची री ओढत असतो. आज महिला कोणत्याच क्षेत्रामध्ये मागे नाही, सर्वच क्षेत्र महिलांनी काबीज करून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. मात्र जोडीदार शोधणं तिला आजही शक्य नाही. त्यामुळे एकल जीवन तिच्या नशिबी येते.दुसरीकडे समाजात सध्या मुलींची संख्या कमी झाली आहे. अनेक समाजात मुलीच मिळत नाहीत. अनेक समाजात कोणतीही मुलगी चालेल अशी स्थिती आली आहे. या मुलांनी एखाद्या विधवेसोबत संसार थाटला तर त्यात गैर काहीच नाही. यासाठी समुपदेशन व पुढाकाराची गरज असल्याने प्रा.डी.एस.लहाने यांनी याबाबत पुढाकार घेतला असून सामाजिक





जनजागृतीचे काम सध्या ते करीत आहेत. यानुषंगाने चिखली शहरात ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व महिला मुक्तीदिनी पुरोगामित्वाची प्रचिती देणारा हा परिचय मेळावा पार पडणार आहे. तालुक्यात तरुण वयात वैधव्य आलेल्या महिलांसह तरूणांचीही संख्या मोठी आहे. तर प्रयत्न करूनही लग्नासासठी मुलगी न मिळणायांचीही संख्या मोठी आहे. त्यानुषंगाने मेळाव्यातून समुपदेशन होण्यासह अनेकांना जोडीदार मिळण्याची शक्यता आहे  महात्मा ज्योतीराव फुलेंनी आपला दत्तक पुत्र यशवंत याचे लग्न विधवेसोबत लावून देत आदर्श घालून दिला आहे. हा कित्ता पुढे नेण्याची आवश्यकता आहे. त्यानुषंगाने विवाहयोग्य तरुण, इच्छुक पालकांनी व विवाह इच्छुकांनी संपर्क करण्याचे आवाहन आयोजक डी.एस.लहाने यांनी केले आहे.

## बदलीच्या कामासाठी महिलेचा विनयभंग खामगाव येथील राज्य कर उपायुक्ताविरोधात अखेर गुन्हा दाखल...

**जनसंचलन /खामगाव**

खामगाव येथील वस्तू व सेवाकर कार्यालयात झालेली बदली रद्द करून त्याऐवजी सोयीच्या ठिकाणी प्रतिनियुक्ती मिळण्याच्या प्रस्तावाला शिफारस पत्र देण्यासाठी येथील राज्य कर उपायुक्ताने महिला कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी केल्याचा आरोप पिडीत महिलेने केला असून या प्रकरणात अमरावती येथील गाडगेनगर पोलिस ठाण्यात अखेर १४ डिसेंबर २०२३ रोजी विनयभंगासह ॲट्रॉसिटीअंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पिडीत महिला कर्मचाऱ्याने गाडगे नगर पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार आधीच्या ठिकाणावरून खामगाव येथे बदली झाली होती. मात्र, वैद्यकीय कारणास्तव खामगाव हे ठिकाण गैरसोयीचे असल्याने त्याठिकाणाऐवजी सोयीच्या ठिकाणी प्रतिनियुक्ती मिळण्यासाठीचा अर्ज नागपूर येथील वस्तू व सेवाकर विभागाच्या अपर राज्य कर आयुक्तांकडे केला होता. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्याने खामगाव येथील अधिकाऱ्याची शिफारस असेल, तर प्रतिनियुक्ती देता येईल, असे पिडीत महिलेस सांगितले होते. त्यानुसार पीडित महिलेने खामगाव येथील राज्य कर उपायुक्त मारोतराव राठोड यांना प्रतिनियुक्तीसाठी शिफारस पत्र देऊन बदली करण्याची मागणी विनंती केली होती. परंतु राज्य कर उपायुक्त राठोड यांनी त्याचा गैरफायदा घेत पीडित कर्मचारी



महिलेला लज्जास्पद बोलत तिच्या व्हॉट्सॲपवर शरीरसुखाची मागणी करणारे मेसेज पाठविल्याचा आरोपही पीडीत महीलेने तक्रारीत केला आहे. हा प्रकार १८ ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत घडल्याचे तक्रारीत म्हटले, तसेच महिलेने दिलेल्या तक्रारीसोबत विविध विविध प्रकारचे अश्लील संभाषण करुन पीडितेचा विनयभंग केल्याचे ही तक्रारीत नमुद आहे. तसेच तक्रारीसोबत पिडित महिलेन स्क्रीनशॉट, रेकॉर्डिंगचे पुरावे जोडल् आहेत. त्यावरून अमरावती शहरातील गाडगेनगर पोलिसांनी आरोप राज्यकर उपायुक्त मारोतराव राठोड यांच्यावर भादंविच्या कलम ३५४ अ ३५४ ड, ५०९, तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ (१), डब्ल्यू- नुसार गुन्हे दाखल करण्यात आले पुढील तपास ठाणेदार अनिल बेहरर्ण यांच्या मार्गदर्शनात करण्यात येत आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# विहिरीत बुडून शेतकऱ्याचा मृत्यू



जनसंचलन/चिखली

अंढेरा येथील शेतकरी शिवनाथ जगन्नाथ शिंदे (वय ५० वर्ष) यांचा मोटरपम्प सुरू करण्यासाठी विहिरीवर पाय घसरून पाण्यात बुडुन मृत्यू झाल्याची घटना २० डिसेंबर रोजी दुपारी ३- ३० घडली. देऊळगाव राजा तालुक्यातील पाडळी शिंदे येथील रहिवासी शिवनाथ जगन्नाथ शिंदे हे पिकांना पाणी देण्यासाठी शेतात गेले असता विहिरीवरील मोटारपंप पाणी येत नसल्याने पाईप हलविण्याचा प्रयत्न करीत असताना तोल जाऊन विहिरीच्या पाण्यात पडून बूडाल्याने मृत्यू झाला. ही घटना २० डिसेंबर बुधवारी दुपारी साडे तीन वाजता घडली सदर घटनेची माहिती पोलीस पाटील भारत शिंदे यांनी पोलीस स्टेशन ला दिली असता पोलिसांनी घटनास्थळी दाखल झाले त्यात वाघ, गोरख राठोड, रामेश्वर आंधळे यांनी धाव घेत सदर मृतदेह तातडीने ग्रामस्थ यांच्या मदतीने विहिरीत गळ सोडून बाजेवर मृतदेह पाण्यातुन बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी देऊळगाव मही येथील ग्रामीण रुग्णालयात नेऊन रात्री शोकाकुल वातावरण अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा आप्त परिवार आहे

# चोरी करण्यासाठी सोबत येण्यास नकार दिल्याने युवकास शस्त्राने मारून जखमी केले

जनसंचलन/ खामगाव



खामगाव चोरी करण्यासाठी सोबत येण्यास नकार दिल्याने एकाने युवकास धारदार शस्त्राने मारहाण करून जखमी केल्याची घटना शहरालगत असलेल्या वाडी येथे घडली. याबाबत विशाल रतन विरघट वय २१ रा. साईनगर वाडी याने शहर पोलिस स्टेशनला तक्रार दिली की, गावातीलच शुभम संतोष चांदुरकर वय ३० वर्ष याने त्याला १३ डिसेंबर रोजी रेल्वेगेट जवळील विहिरीवर बोलाविले व या ठिकाणी तू माझ्यासोबत चोरी करायला येत जा, दारू गांजा पित जा असे म्हणाला, त्याने नकार दिल्याने हातातील धारदार वस्तूने मारहाण करून विशाल याला जखमी केले. तसेच अश्लिल शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी शुभम चांदूरकर याच्याविरूध्द कलम ३२३, २९४, ५०४, ५०६ भा.दं. वि. नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एएसआय बळीराम वरखेडे हे करीत आहेत.

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

जनसंचलन/ नांदुरा

येथील साळीपुरा भागातील २८ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १७ डिसेंबरच्या दुपारी २ वाजता उघडकीस आली. पंकज श्रीराम लाहुळकर वय २८ वर्ष रा. नांदुरा खुर्द असे मृतकाचे नाव आहे. याबाबत मृतकाचा भाऊ संदीप श्रीराम लाहुळकर वय ३७ वर्षे रा. नांदुरा खुर्द यांनी नांदुरा पोलीस स्टेशनला दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, माझा लहान भाऊ पंकज श्रीराम लाहुळकर यांनी राहते घरात लाकडी बल्लीला दोरीच्या




सहाय्याने गळफास घेऊन मरण पावला आहे. या माहितीवरून नांदुरा पोलिसांनी मृत्यूची नोंद केली आहे. पंकज हा मनमिळावू स्वभावाचा तरुण होता. त्याच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत

# आता मलकापूर ते संभाजीनगर रेल्वे बुलढाण्यातून धावणार...

## हिवाळी अधिवेशनात ५३ तारांकित, १२ लक्षवेधी व २ औचित्याच्या मुद्यासह एक प्रस्ताव..

जनसंचलन/बुलढाणा





बुलढाणा खामगाव ते जालना रेल्वे मार्ग १२५ वर्षापासून प्रलंबित असताना, ते भिजत घोंगडे बाजूला ठेवून.. मलकापूर ते छत्रपती संभाजी नगर व्हाया बुलढाणा या रेल्वे मार्गाचा अफलातून प्रस्ताव कथन केला तो शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी. त्याचा डीपीआरही काहीच दिवसात तुमच्या हातात देवू, असा आत्मविश्वास त्यांनी बोलून दाखवला पत्रकार परिषदेत. विशेष म्हणजे यापूर्वीही त्यांनी विश्वास न बसणारी कामे बुलढाणा मतदारसंघात करून दाखवली आहेत. राजुर घाटाला भेदून ही रेल्वे धावेल, असेही त्यांनी सांगून.. नुकत्याच पार पडलेल्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आपण ५३ तारांकित, १२ लक्षवेधी व २ औचित्याच्या मुद्यासह एक प्रस्ताव.. सादर केला होता व ते सर्व चर्चेलाही आले होते, असे गुरुवार २१ डिसेंबर रोजी पत्रकारांपुढे सादर केला. मातोश्री जनसंपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलतांना आ. गायकवाड म्हणाले की, संपूर्ण जिल्हाच हा आता दुष्काळाच्या कक्षेत आला असून विदर्भातील शेतकऱ्यांना कापूस आणि सोयाबीनच्या नुकसानापोटी हेक्टरी २७ हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना जिल्ह्यातील अवर्षण स्थिती पहाता भरघोस मदत देण्याची मागणी त्यांनी विधीमंडळात केली होती. त्यानुषंगाने २० डिसेंबर रोजी विधीमंडळात बोलतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही भरघोस मदत देण्यात येणार असल्याची माहिती दिली. हेक्टरी २७ हजार रुपये तीन हेक्टरच्या मर्यादेता ही मदत शेतकऱ्याला मिळणार असल्याचे या पत्रकार परिषदेत आ. संजय गायकवाड म्हणाले. यापूर्वी आतापर्यंत अशा पद्धतीची भरघोस मदत दिली गेली नव्हती. दुष्काळी स्थिती पाहता बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत मिळणे क्रमप्राप्त आहे. त्याची व्याप्ती वाढविणे गरजेचे होते, असे ते म्हणाले. बुलडाणा येथे होणारे मेडिकल कॉलेजसाठी शंभर एकर जागा मिळावी यासाठी विधिमंडळाचे नागपूर अधिवेशनात चर्चा झाली आहे. तो प्रश्न मार्गी लागला आहे. रेल्वेसाठी मोठमोठे डोंगर फोडले. त्यामुळे राजूर घाट हा छोटा आहे. इथे रेल्वे धावण्यासाठी लवकरच सर्वे क्षण होईल. याशिवाय विस्तारित एमआयडीसीसाठी जागेचा प्रश्न मार्गी लागला असून आजपर्यंत कोणी केली नाही, अशी भरघोस मदत सोयाबीन व कापूस उत्पादकांना देण्यात येणार असल्याची माहिती आ. गायकवाड यांनी पत्रकार परिषदेता दिली.

# वस्तू व सेवाकर विभागाच्या सहाय्यक आयुक्तास २१ लाखाची लाच देतांना मलकापूरचे व्यापारी प्रविण अग्रवाल अटक

जनसंचलन / खामगाव



खामगाव सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचा २ कोटी ७७ लाख तर व्याजासह २ कोटी ९४ लाख ऐवजी सदर टॅक्स कमी करुन फायनल ऑर्डर निल (काहीच बाकी नाही) काढून देण्यासाठी मलकापूरचे मे. बजरंग इंडस्ट्रीजचे मालक प्रविण मदनलाल अग्रवाल वय ४४ वर्षे यांना दि २० डिसेंबर रोजी जीएसटी कार्यालयाचे संबंधित कक्षात सापळा रचून रंगेहाथ पकडण्यात आले. सदर सापळा तक्रारदार पुरुष वय ४३, सहाय्यक राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग खामगाव यांच्या तक्रारीवरुन जालना येथील लाच लुचपत प्रतिबंधक खात्याने रचला होता. यावेळी ५०० च्या ५०० नोटा अर्थात २ लाख ५० हजार रुपये जप्त करण्यात आले. सदर सापळ्यात पूर्वी झालेला संवाद व व्हाईस रेकॉर्डिंग सुध्दा आहे. सदर सापळा किरण बिडवे, पोलिस यांनी रचला. त्यासाठी दोन पंच, व्हाईस रेकॉर्डरसह लॉचेची पडताळणी केली. व्यापारी अग्रवाल आले. तीन लाखात तडजोड ठरली. पैसे घेवून येतो म्हणून परत गेले. थोड्या वेळाने पैसे घेवून कक्षात आले. कॅश टेबलवर ठेवली. नंतर सहाय्यक आयुक्तांनी इशारा केल्यावरुन पंचासमक्ष अग्रवाल यांना रंगेहाथ पकडले. या सर्व घटनाक्रमाबाबत बोलणे रेकॉर्ड झाले आहे. एकूणच घडलेल्या या प्रकारामुळे व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात खामगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी प्रविण अग्रवाल यांना अटक करण्यात आली आहे.

# एकनाथ शिंदेंना पक्षातून काढून टाकलं तर मग कसला आला व्हीप? ॲड.महेश जेठमल

वृत्तसंस्था/ नागपूर

शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी ३० जून रोजी एकनाथ, शिंदे, दीपक केसरकर, उदय सामंत आणि अन्य काही जणांना पक्षातून काढून टाकल्याचे पत्र जाहीर केले. एकदा पक्षातूनच काढून टाकले तर पक्षाने विधानसभा अध्यक्ष आणि सरकारच्या विश्वासदर्शक ठरावाच्या मतदानासाठी जाहीर केलेला व्हीप (पक्षादेश) शिंदेंना कसा लागू पडेल? जर पक्षादेश लागूच होत नाही; तर अपात्र होण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असा युक्तिवाद शिंदे गटाचे वकील वरिष्ठ अधिवक्ता महेश जेठमलानी यांनी बुधवारी आमदार अपात्रता सुनावणीदरम्यान केला. आमदार अपात्रतेची सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. यात ठाकरे गटाचा युक्तिवाद मंगळवारी संपला. यानंतर मंगळवारी लगेच शिंदे गटाचा युक्तिवाद सुरू झाला. बुधवारी सकाळीसुद्धा शिंदे गटाने युक्तिवाद केला. ठाकरे गटातर्फे वरिष्ठ अधिवक्ता देवदत्त कामत यांनी बाजु मांडली तर शिंदे गटातर्फे वरिष्ठ अधिवक्ता महेश जेठमलानी बाजू मांडत आहेत. जेठमलानी यांनी यावेळी ३० जून रोजीच्या कागदपत्रांवर बोट ठेवले. ठाकरे गटाने ३० जून रोजी राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक बोलावून त्यात शिंदेंना पक्षातून बाहेर काढण्याचा ठराव पारित केला. एकीकडे तुम्ही म्हणता की आम्ही शिंदेंना पक्षाबाहेर काढले आणि दुसरीकडे त्यांना व्हीप न पाळल्याबाबत अपात्र करण्याची विनंतीसुद्धा करता, हा विरोधाभास असल्याचा युक्तिवाद जेठमलानी यांनी केला.२१ जून रोजी शिंदे व त्यांचे सहकारी आमदार सूरतला गेले. त्यानंतर २३ जून रोजीच ठाकरे गटाने या आमदारांच्या अपात्रतेची याचिका तयार केली. त्यावर सहीसुद्धा झाली. २४ जून रोजी ती दाखलही करण्यात आली. एखाद्या आमदाराचे सभागृहातील गैरवर्तन अथवा व्हीप न पाळण्याच्या कृतीवरून त्याचा पक्ष त्याच्या अपात्रतेसाठी अर्ज करू शकतो. मात्र, तोवर सभागृहात काहीच घडले नव्हते. त्यापूर्वीच अपात्रतेची याचिका दाखल करण्यात आली. तसेच शिंदेंनी सभागृहात काही कृती करण्यापूर्वीच उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामासुद्धा दिला होता, अशी माहिती यावेळी जेठमलानी यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिली.ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांनी साक्षीदरम्यान दिलेल्या बयाणांमध्ये बरीच तफावत आहे. ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली काही कागदपत्रे आणि या सुनावणीतील कागदपत्रे यांच्यावरील सह्या व नावे यांच्यातही फरक आहे. राहुल शेवाळे राष्ट्रीय समितीचे सदस्य नसूनसुद्धा त्यांच्या सह्या घेण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहे. प्रभू म्हणतात राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक समोरासमोर झाली; मात्र ठरावात व्हिडीओ कॉन्फरन्सचा उल्लेख आहे. त्यामुळे ठाकरे गटाची बहुतांश कागदपत्रे खोटी असल्याचाही दावा यावेळी जेठमलानी यांनी केला. एखाददुसरा सरळ बॉल वगळता एकनाथ शिंदे गटाच्या वकिलांनी आमदारांच्या अपात्रता सुनावणीत केलेला युक्तिवाद म्हणजे नो बॉल, डेड बॉल आणि वाइड बॉलचे मिश्रण आहे, असा टोला ठाकरे गटाच्या वकिलांनी लगावला. आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावरील सुनावणीमध्ये बुधवारी दोन्ही पक्षांनी आपला युक्तिवाद पूर्ण केला. विधानसभा अध्यक्ष यांनी या प्रकरणाचा निकाल राखून ठेवला आहे. ठाकरे गटाने सादर केलेल्या कागदपत्रांपैकी बहुतांश कागदपत्रे खोटी असल्याचा दावा व युक्तिवाद



शिंदे गटाचे वकील वरिष्ठ अधिवक्ता महेश जेठमलानी यांनी केला. याला प्रत्युत्तर देताना वरिष्ठ अधिवक्ता देवदत्त कामत यांनी शिंदे गटाचा युक्तिवाद म्हणजे त्यांनी केलेल्या कृत्यांचे लंगडे समर्थन (लेम डक आर्ग्युमेंट) असल्याचा टोला लगावला. विधानसभा अध्यक्षांनी ही सुनावणी घेताना प्रथमदर्शनी (प्रायमा फेसी) स्थितीवर निर्णय द्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले होते. पक्षांतर बंदी कायदा करताना अनुच्छेद १०मध्ये करण्यात आलेल्या तरतुदींनुसार या अनुच्छेदाला भारतीय साक्षीपुरावा कायदा (एव्हिडन्स ॲक्ट) लागू होत नाही, असा दावा कामत यांनी केला. त्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सहा निर्णयांचे दाखलेलसुद्धा दिले.

# इंडिया आघाडीच्या बैठकीपूर्वी पंतप्रधानपदाच्या चेहऱ्याविषयी उद्धव ठाकरेंचं महत्त्वाचं वक्तव्य...

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

इंडिया आघाडीच्या दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी या आघाडीच्या नेतृत्त्वाविषयी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. देश वाचवण्यासाठी इंडिया आघाडीतील पक्ष एकत्र आले आहेत. मात्र, या आघाडीला आता समन्वयक किंवा निमंत्रकाची गरज आहे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. ही जबाबदारी तुमच्याकडे आल्यास तुम्ही ती स्वीकारणार का, असा प्रश्न विचारल्यावर मात्र त्यावर बोलणे उद्धव ठाकरे यांनी टाळले. ते मंगळवारी दिल्लीत इंडिया आघाडीच्या बैठकीपूर्वी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी इंडिया आघाडीच्या नेतृत्वाविषयी भाष्य केले. त्यांनी म्हटले की, आजच्या बैठकीत छत्तीसगढ, राजस्थान आणि मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावर चर्चा होईल. येत्या काही दिवसांत जानेवारी महिना उजाडेल, हे निवडणुकीचं वर्ष आहे. त्यादृष्टीने तयारीला लागण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने आजच्या बैठकीत आम्ही बाकीच्यांच्या सूचना ऐकून घेऊन आणि त्यावर आमची मतं मांडू. पंतप्रधान मोदी यांच्यासमोर इंडिया आघाडीचा चेहरा कोण? हा विषय आहेच. पण आता या आघाडीला कोणी एक समन्वयक म्हणा, निमंत्रक म्हणा, याची गरज आहे. इंडिया आघाडीतील कोणत्याही नेत्याच्या डोक्यात नेतृत्त्व करण्याची हवा नाही. आम्हाला देश वाचवायचा आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. इंडिया आघाडीने पंतप्रधानपदाचा चेहरा निवडला नाही तरी एका निमंत्रकाची गरज आहे. उद्या निमंत्रकच पंतप्रधान होईल, असे काही नाही. निवडणुकीचं घोडामैदान आता जवळ आलंय, सैन्यही जमलंय, पण या सैन्याला पुढे घेऊन जाणारा कोणीतरी हवा. एरवी सगळे नेते आपापल्या राज्यात बिझी असतात. या सगळ्यांना एकत्र आणणारी व्यक्ती हवी, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. यावर पत्रकारांनी त्यांना, ही जबाबदारी तुमच्याकडे आली तर स्वीकाराल का?, असा प्रश्न त्यांना विचारला. तेव्हा उद्धव यांनी म्हटले की, मीदेखील आजच्या बैठकीत काही नावं सुचवणार आहे. तसेच मी काही हरभऱ्याच्या झाडावर चढणाऱ्यांपैकी नाही. मी मुख्यमंत्रीपद हे जबाबदारी म्हणून स्वीकारले होते. मला जेव्हा कळाले तेव्हा मी मुख्यमंत्रीपद एका झटक्यात सोडलंही होतं. मी काही वेडीवाकडी



स्वप्न पाहणार नाही. मला पंतप्रधान व्हायचंय, असं नुसतं स्वप्न पाहण्यात काय अर्थ आहे. जनतेलाही तुम्ही पंतप्रधान म्हणून हवे आहात का? याचा विचार केला पाहिजे. इंडिया आघाडीतील मतभेद आता मिटले असून सर्वजण एकत्र आले पाहिजे. आगामी काळात आघाडीतील सर्व पक्षांनी एकत्र राहायला पाहिजे. इंडिया आघाडीच्या डोळ्यासमोर पंतप्रधान मोदी नाहीत, तर भारत देश आहे. मध्य प्रदेशात शिवराजसिंह चौहान यांना बदललं तसं मोदींनाही बदललं जाऊ शकतं. हा भाजपचा प्रश्न आहे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

# विधानपरिषद शतकमहोत्सवानिमित्त ९६ वर्षीय ज्येष्ठ माजी सदस्य ॲड. गोविंदराव आठवले यांचा सत्कार

वृत्तसंस्था/नागपूर

महाराष्ट्र विधानपरिषदेचे ९६ वर्षीय सर्वात ज्येष्ठ माजी सदस्य ॲड. गोविंदराव आठवले यांचा आज दिनांक २० डिसेंबर रोजी संध्याकाळी हृद्य सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र विधानपरिषदेला १०० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ८ नोव्हेंबर, २०२३ आणि ८ डिसेंबर, २०२३ रोजी अनुक्रमे मुंबई आणि नागपूर येथे जो समारंभ झाला त्याला वयोमानामुळे ॲड. गोविंदराव आठवले, माजी विधानपरिषद सदस्य उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांचे वय ९६ वर्ष आहे, त्यामुळे त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करण्यात यावा यासाठी विधानपरिषदेच्या माननीय उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या सूचनेनुसार त्यांचे खाजगी सचिव श्री. रविंद्र खेबुडकर, विधानमंडळाचे जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने, उप सभापतींचे विशेष कार्य अधिकारी संतोष उडतेवार यांनी ॲड. गोविंदराव आठवले यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचा शाल, गौरवचिन्ह, विधानमंडळातर्फे प्रकाशित राजर्षी छत्रपती शाहू महाराज ग्रंथाची प्रत आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी त्यांचे पुतणे अतुल आठवले आणि परिवारजन तसेच ते विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य असतांना त्यांचे स्वीय सहाय्यक म्हणून जबाबदारी पार पाडणारे ज्येष्ठ पत्रकार श्री. सुधीर पाठक उपस्थित होते. सन १९७२ ते १९७८ याकाळात ॲड. गोविंदराव आठवले विदर्भ पदवीधर मतदारसंघाचे विधानपरिषदेत प्रतिनिधित्व करीत होते. वयाच्या ९६ व्या वर्षी देखील ज्येष्ठ माजी सदस्य ॲड. गोविंदराव आठवले यांची स्मरणशक्ती आणि वाणी तीक्ष्ण असून त्यांनी या सत्कारप्रसंगी १९७२ ते १९७८ या काळातील विधानपरिषदेतील अनेक महत्वाचे प्रसंग, आठवणींना उजाळा देत सत्काराबद्दल आनंद आणि धन्यवादाची भावना व्यक्त केली. यावेळी त्यांनी दत्तोपंत ठेंगडी यांचे चरित्र कृतज्ञतापूर्वक माननीय उपसभापती डॉक्टर नीलमताई गोऱ्हे यांना सस्नेह भेट दिले.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day | Hight | Width |
|---|---|---|---|---|---|
| 8x8 cm | 5000/- | 3500/- | 2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Price | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही निःशुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

**अधिक माहितीसाठी संपर्कः**

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com